# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १८३ | शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### शिवसेनेचे पुणे शहर उपसंघटक दीपक कुलाळ यांच्यावर जीवघेणा हल्ला

**पुणे, ता. २२ :** शिवसेनेचे पुणे शहर उपसंघटक दीपक कुलाळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते उल्हास तुपे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. उल्हास तुपे यांनी अंगावर स्कॉर्पिओ वाहन घालत तसेच डोक्यात दगड घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा दावा दीपक कुलाळ यांनी केला आहे. कुलाळ यांच्या आरोपानुसार, सुमारे ४० ते ५० जणांच्या गुंडांच्या टोळीने तीन शिवसैनिकांवर हल्ला केला. या हल्ल्यात दीपक कुलाळ गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा सर्व प्रकार हडपसर येथील विठ्ठलराव तुपे नाट्यगृह परिसरात घडला. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले करत आहेत. मात्र, या हल्ल्यामागील नेमकेकारण अद्याप स्पष्ट झालेले नाही

# ...अखेर प्रशांत गवळीवर हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल!

## फसवणुकीची व्याप्ती ४ ते ५ हजार कोटींची असण्याची शक्यता

**विशाल कदम**

लोणी काळभोर, ता. २२: दामदुप्पट अथवा प्रतिमाह १० टक्के परतावा देण्याच्या नावाखाली हडपसर (पुणे) येथील समर्थ क्रॉप केअर कंपनीचे मालक प्रशांत गवळी व त्याच्या सहकाऱ्यांनी पुणे, सोलापूरसह राज्यातील १२ हून अधिक जिल्ह्यातील ४० हजाराहून अधिक नागरिकांकडून ४ ते ५ हजार कोटींची माया बेकायदा गोळा केली आहे. या फसवणुकीच्या घोटाळ्याच्या संदर्भात पुणे प्राईम न्यूजने बातम्यांच्या माध्यमातून वारंवार आवाज उठवून जनजागृती केली. आपले भिंग कधीही फुटणार म्हणून मागील पाच महिन्यांपासून गुंतवणूकदारांना परतावा देणे बंद करण्यात आले होते. गुंतवणूकदारांनी मुद्दल मागण्याचा तगादा लावल्यानंतर त्यांना धमकी देण्यात येत होती. परंतु, या धमक्यांना न घाबरता काही गुंतवणूकदारांनी थेट पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. आज अखेर प्रशांत गवळी व त्यांच्या सहकाऱ्यांवर हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रशांत अनिल गवळी व त्यांच्या इतर साथीदारांवर भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३३६ (२), ३३६ (३), ३४० (२), ३१६ (५), ३ (५), ६१ (२) व महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण) अधिनियमन १९९९ चे कलम ३ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी लक्ष्मी विजय बर्लाल (वय ६१,रा. १४७ सोमवार पेठ, त्रिशुंढ गणपती समोर, आत्रे वाडा, पुणे) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रशांत अनिल गवळी यांच्या इंस्टाग्राम, फेसबुक व सोशल मिडीयावरील व्हिडीओ पाहुन फिर्यादी लक्ष्मी बर्लाल यांच्या




मैत्रिणीने ५० हजार रुपये गुंतवले होते. समर्थ क्रॉप केअर या कंपनीमध्ये पैसे गुंतविल्यास गुंतवणुकीवर दरमहा ५ टक्के नफा व ५ टक्के मुददल अशी एकूण १० टक्के रक्कम दरमहा मिळत आहे. असे फिर्यादी लक्ष्मी बर्लाल यांना त्यांच्या मैत्रिणीने सांगितले होते. त्यामुळे फिर्यादी लक्ष्मी बर्लाल यांनी त्यांच्याजवळील जमा असलेल्या रकमेचा कोठेतरी गुंतवणुक करुन, फायदा मिळेल या आशेने दोन लाख रुपये समर्थ क्रॉप केअर या कंपनीत गुंतविले होते.

### पोलिसांच्या कारवाईकडे गुंतवणूकदारांचे लक्ष

प्रशांत गवळी याने वारंवार ऑफलाईन सेमीनार, झुम मिटींग, गुगल मिट, ग्रुप मिटींग घेवून कंपनीच्या ब्रोकींग हाऊसच्या मध्यमातून कंपनीचे डिमॅट, इन्शुरन्स, बँकिंग, म्युचल फंड, ए.आय.एफ. अंतिम देह नमूद यामध्ये पैसे गुंतवण्यास सांगून गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक केली आहे. फसवणुकीच्या जाळ्यात ४० हजाराहून अधिक गुंतवणूकदार अडकले असून याची व्याप्ती ४ ते ५ हजार कोटींच्या आसपास असू शकते. या गुंतवणुकीत प्रशासनातील अनेक बड्या अधिकाऱ्यांनी बेकायदा जमा केलेली मोहमाया गुंतवलेली आहे. त्यामुळे हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आपला हा भांडाफोड समोर येईल म्हणून अद्यापपर्यंत कारवाई केली नव्हती. परंतु, आता प्रशांत गवळी व त्याच्या सहकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाल्यामुळे पोलीस प्रशासन कारवाई करणार की बघ्याची भूमिका बजाविणार? यावर गुंतवणूकदारांचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

समर्थ क्रॉप केअर कंपनी फ्रॉडसंदर्भात ऑगस्ट २०२५ मध्ये तारीख आठवत नाही, पेपरला एक बातमी आली होती, परंतु, फिर्यादी लक्ष्मी बर्लाल यांना गुंतवणुकीवर १० हजार रुपये प्रति महिना याप्रमाणे प्रथम दोन महिने २० हजार रुपये त्यांना मिळाले होते. त्यामुळे त्यांनी याकडे लक्ष दिले नाही. त्यानंतर सप्टेंबर २०२५ नंतर दरमहा मिळणारी रक्कम बंद झाली. फिर्यादी लक्ष्मी बर्लाल या समर्थ क्रॉप केअर कंपनीच्या ऑफिसमध्ये चौकशीसाठी गेल्या. तेव्हा अनेक गुंतवणूकदारदेखील तेथे उपस्थित होते. त्यावेळी प्रशांत गवळीने तुमचे पैसे दिवाळीमध्ये २२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत परत करु, असे सांगितले होते. परंतु, त्यानंतर पुन्हा पैसे मिळालेच नाहीत.

दरम्यान, समर्थ क्रॉप केअर कंपनीचे मालक व संचालक प्रशांत अनिल गवळी याचा शेतीविषयक व्यवसाय असल्याचे गुंतवणूकदारांना सांगितले होते, व तसे त्यांचे सोशल मिडीयावर अनेक व्हिडीओ देखील आहेत. शेती विषयक व्यवसायसंदर्भात हडपसर येथील समर्थ क्रॉप केअर कंपनी व्यतिरीक्त, नारायण गाव, मंचर, पुणे येथे गो फार्मली नावाची शेतमाल एक्सपोर्ट करणारी कंपनी आहे. तसेच फर्ग्युसन रोड, पुणे येथे फ्रिडीगो नावाची कंपनी आहे. प्रशांत गवळीने शेतकऱ्यांना आधुनिक शेती विषयक माहिती दिली आहे. अनेक शेतकरी व इतर लोकांना तो दुबई येथे घेवुन गेला होता. शेतमाल मोठ्या प्रमाणात गल्फ देशात एक्सपोर्ट करण्याचा व्यवसाय असल्याची गवळी बतावणी करत होता. समर्थ क्रॉप केअर या कंपनीचे मालक प्रशांत अनंत गवळी यांच्याविरुध्द कोणीतरी तक्रारी अर्ज केल्याने त्यांची कंपनी बंद झालेली असुन शेकडो लोकांचे पैसे बुडाल्याचे समजले. प्रशांत अनिल गवळी व त्यांचे इतर साथीदारांनी व्यवसायाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात पैसा गोळा केला आहे. कोणत्याही प्रकारची कायदेशीर परवानगी नसताना विविध योजनांच्या माध्यमातून हजारो गुंतवणूकदारांच्या ठेवी स्वीकारल्या आहेत. नागरिकांनी केलेल्या गुंतवणुकीवर ठरल्याप्रमाणे परतावा न दिल्याने नागरिकांची फसवणूक केली आहे. अशी तक्रार लक्ष्मी बर्लाल यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रशांत गवळी व त्यांच्या साथीदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्चना गायकवाड करत आहेत.

# इंदापूरमध्ये अंकिता पाटील आणि श्रीराज भरणे निवडणुकीच्या रिंगणात आमने सामने

**इंदापूर, ता. २२ :** महानगरपालिकेच्या निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी इंदापूर तालुक्यात राजकीय घडामोडींनी वेग घेतला. अनेक वर्षे कट्टर राजकीय विरोधक म्हणून ओळखले जाणारे राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे एकाच व्यासपीठावर आले असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ या चिन्हावर समर्थकांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.




या घडामोडीमुळे इंदापूरच्या राजकारणात मोठा संदेश गेला आहे. माध्यमांशी बोलताना दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केलं की, आमच्यात कधीही वैयक्तिक भांडण नव्हतं. राजकीय मतभेद होते, ते आता बाजूला ठेवून आम्ही एकत्र आलो आहोत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सर्व जागांवर आमचे उमेदवार निवडून येतील, असा आम्हाला विश्वास आहे. भरणे यांनी आपल्या मुलाच्या उमेदवारीवरही भाष्य केलं. माझ्या मुलाचं नुकतंच कॉलेज पूर्ण झालं आहे. तो समाजकार्य करत असतो, शिबिरं घेतो, दिव्यांग वधू-वर मेळाव्याचं आयोजनही त्याने केलं होतं. निवडणूक लढवण्याची त्याची इच्छा नव्हती, पण कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे त्याने फॉर्म भरला, असं भरणे म्हणाले.

इंदापूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ८ जागांसाठी ११४, तर पंचायत समितीच्या १६ जागांसाठी २१३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. अर्ज छाननी आणि माघारीनंतर अंतिम चित्र स्पष्ट होणार असलं, तरी तालुक्यात खरी लढत घड्याळ विरुद्ध कमळ अशीच होणार, हे स्पष्ट दिसत आहे. या निवडणुकीत आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे पुढील पिढीला राजकारणात संधी देण्याचा प्रयत्न. हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब जगदाळे यांचे चिरंजीव यशराज जगदाळे, तसेच दत्तात्रय भरणे यांचे पुत्र श्रीराज भरणे हे नव्या पिढीचे चेहरे मैदानात उतरले आहेत.

एकीकडे जुने राजकीय वाद बाजूला ठेवत नेते एकत्र येत आहेत, तर दुसरीकडे नव्या नेतृत्वाला संधी दिली जात आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्यातील ही निवडणूक केवळ सत्तेची लढाई न राहता, बदलत्या राजकीय समीकरणांची आणि पुढील पिढीच्या प्रवेशाची कसोटी ठरणार आहे.

# उरुळी कांचन जिल्हा परिषद गटातील उमेदवारीवरून वाद

## भाजप कार्यकर्त्यांचा जाहीर निषेध मेळाव्याचे आयोजन

**उरळी कांचन, ता. २२ :** उरुळी कांचन जिल्हा परिषद गटात भारतीय जनता पार्टीकडून करण्यात आलेल्या चुकीच्या व परस्परविरोधी उमेदवारी घोषणेमुळे पक्षात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. जाहीर करण्यात आलेली उमेदवारी तात्काळ बदलण्यात यावी या मागणीसाठी कठोर भूमिका घेऊन भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी जाहीर निषेध मेळाव्याचे आयोजन केले असून, पक्षातील अंतर्गत नाराजी आता उघडपणे समोर येत आहे.




जिल्हा परिषद गटातील अनेक निष्ठावान, वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कार्यकर्तांना डावलण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. पक्षासाठी प्रत्येक निवडणुकीत झटणाऱ्या कार्यकर्तांच्या भावना पायदळी तुडवल्या गेल्या असून, नेतृत्वाने घेतलेला निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अशी ठाम मागणी निषेध मेळाव्याद्वारे केली जाणार आहे.


या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील श्रीकृष्ण मंगल कार्यालयात शुक्रवारी (ता. २३) जाहीर निषेध या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने तळागाळातील कार्यकर्त्यांच्या संतप्त भावना समजून घ्याव्यात आणि अन्यायकारक उमेदवारी निर्णयात तात्काळ बदल करावा, अन्यथा पक्षाला त्याचे गंभीर राजकीयपरिणाम भोगावेलागतील, असा इशाराही या माध्यमातून देण्यात येणार आहे. हा मेळावा केवळ निषेधासाठी नसून, पक्षांतर्गत अन्यायाविरोधातील थेट आवाज असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

> ‘ भाजपा नेते सुदर्शन चौधरी तसेच सारिका लोणारी या मागील १५ वर्षांपासून पक्षात प्रामाणिकपणे काम करतात. त्यामुळे निष्ठावान म्हणून त्यांना संधी देण्यातच आली आहे. उरुळी कांचन जिल्हा परिषद गटासाठी जीवन महाराज शिंदे यांच्याबाबात काही त्रुटी झाल्या हे आम्हाला नक्कीच मान्य आहेत. येणाऱ्या काळासाठी समोर मोठा ग्रुप आपल्या पार्टीत सामील झाला तर भाजपा पक्ष पुढील काळात आणखी सक्षम होणार आहे. त्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सर्वांनी सोबत राहून एक राहून भविष्यकाळात अनेकांना नक्कीच मोठी संधी देण्यात येईल. त्यामुळे आता ठरलेले तिन्ही उमेदवार नक्कीच मोठ्या मताधिक्क्याने विजयी करू
>
> - **गणेश चौधरी,** तालुकाध्यक्ष, भाजपा हवेली तालुका

# पुणे ग्रँड चॅलेंज टूरच्या निमित्ताने ६ हजार कंपन्या आणि शाळांना सुट्टी

**पुणे, ता. २२ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात होणाऱ्या पुणे ग्रँड चॅलेंज टूर या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने वाहतूक व्यवस्थेसंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. ही स्पर्धा शुक्रवारी २३ जानेवारी रोजी होणार असून, त्या दिवशी संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी भोसरी एमआयडीसी परिसरातील सुमारे ६ हजार कंपन्यांना सुट्टी देण्यात आली आहे. तसेच पुणे शहरातील सर्व शाळा दुपारी १२ नंतर बंद ठेवण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.




सायकल शर्यतीचा मार्ग भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शाहूनगर, यशवंतनगर, टेल्को रस्ता आणि स्पाईन सिटी चौक या भागांतून जाणार आहे. या मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक बदल अपेक्षित असल्याने उद्योगांना होणारा त्रास टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेने कंपन्यांना शुक्रवारची सुट्टी देण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार बहुतांश लघु व मध्यम उद्योग बंद राहणार आहेत. याशिवाय, वीज वितरण कंपनीने नियोजित देखभाल दुरुस्तीचे कामही पुढे ढकलले आहे.

दरम्यान, पुणे शहरात या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा समारोप बालगंधर्व रंगमंदिर परिसरात होणार आहे. त्यामुळे शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीत बदल करण्यात येणार आहेत. याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी यांनी पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्व सरकारी आणि खासगी शाळा दुपारी १२ पर्यंतच सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. १२ नंतर शाळांना सुट्टी देण्यात येणार आहे.

ही स्पर्धा सुमारे ५८ ते ७५ किलो मीटरच्या मार्गावर पार पडणार आहे. बालेवाडी ते बालगंधर्व दरम्यानच्या चौकांमध्ये वाहतुकीचे नियोजन बदलले जाणार आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

# पुण्याच्या महापौर पदासाठी ऐश्वर्या पठारे यांचे नाव अचानक आघाडीवर?

## महापौरपदासाठी भाजपचं ‘धक्कातंत्र’; दिग्गज निष्ठावंतांना डावलल्याची चर्चा...

**पुणे, ता. २२ :** भारतीय जनता पक्षाने प्रमुख पदांवर नियुक्ती करताना अनेकदा अनपेक्षित निर्णय घेत धक्कातंत्र वापरल्याचा अनुभव राज्याच्या राजकारणात यापूर्वीही आला आहे. पुणे महापालिकेच्या महापौरपदाबाबतही भाजप असाच धक्का देण्याची शक्यता असून, राजकीय वर्तुळात त्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. यंदा पुणे महापालिकेचे महापौरपद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित झाल्यानंतर भाजपमधील काही निष्ठावंत नगरसेविकांची नावे पुढे येत असतानाच, अचानक राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या ऐश्वर्या पठारे यांच्या नावाची चर्चा रंगूलागली आहे. मुंबईत झालेल्या राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदांच्या आरक्षण सोडतीत पुण्यासाठी खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षण निश्चित झाले. त्यानंतर भाजपमधील मंजुषा नागपुरे, निवेदिता एकबोटे, मंजुश्री खर्डेकर यांसारख्या अनुभवी नगरसेविकांची नावे महापौरपदासाठी चर्चेत आली. मात्र राजकीय समीकरणे वेगळी वळण घेऊ लागली आणि वडगाव शेरी मतदारसंघात ८ नगरसेवक निवडून आणणाऱ्या पठारे कुटुंबातील ऐश्वर्या पठारे यांचे नाव अचानक आघाडीवर आले.




ऐश्वर्या पठारे या विमाननगर लोहगाव प्रभागातून निवडून आल्या असून त्या उच्चशिक्षित आहेत. त्यांचे पती सुरेंद्र पठारे हेही नगरसेवक आहेत, तर सासरे बापूसाहेब पठारे हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार आहेत. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ऐश्वर्या आणि सुरेंद्र पठारे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. प्रवेश करताच भाजपने त्यांना उमेदवारी जाहीर केल्यामुळे पक्षातील निष्ठावंतांमध्ये नाराजी पसरली होती. मात्र या दोघांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत टीकाकारांना उत्तर दिले. महापौरपदासाठी महिला आरक्षण निश्चित झाल्याने भाजपच्या पहिल्या फळीतील गणेश बीडकर, धीरज घाटे, श्रीनाथ भीमाले, राजेंद्र शिळीमकर, किरण दगडे पाटील यांसारख्या नेत्यांना मोठा धक्का बसला आहे. महापौरपदावर आपली वर्णी लागेल या अपेक्षेने बसलेल्या अनेक दिग्गजांचा हिरमोड झाला आहे. दरम्यान, आता प्रश्न इतकाच उरतो की, भाजप पुण्यातही आपली धक्कातंत्राची परंपरा कायम ठेवत ऐश्वर्या पठारे यांना महापौरपदाची संधी देणार का, की पक्षातील निष्ठावंत महिला नगरसेविकांनाच प्राधान्य दिले जाणार? या निर्णयाकडे संपूर्ण पुण्याचे राजकीय लक्ष लागून राहिले आहे.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त



### आंबेगाव पोलिसांनी गुन्हेगाराला गावठी पिस्टलसह ठोकल्या बेड्या

**पुणे, ता. २१ :** आंबेगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने गोपनीय बातमीच्या आधारे केलेल्या कारवाईत एका सराईत गुन्हेगाराकडून एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे जप्त करून त्याला अटक केली आहे. ही कारवाई स्वामीनारायण मंदिराजवळील सर्व्हिस रोड, आंबेगाव खुर्द, पुणे येथे करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक मोहन कळमकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने संशयित सुयश सोमनाथ घोडके(वय २४, रा. नऱ्हे, पुणे) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून अंदाजे ४१हजार रुपये किमतीचे एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. आरोपीविरुद्ध आंबेगाव पोलीस स्टेशन येथे भारतीय शस्त्र अधिनियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करून न्यायालयाकडून २३ जानेवारी २०२६ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आंबेगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

### खुनाच्या प्रयत्नातील ७ महिन्यांपासून फरार विधीसंघर्षित बालक पोलिसांच्या ताब्यात

**पुणे, ता. २१ :** खुनाच्या प्रयत्नाच्या गंभीर गुन्ह्यात गेल्या ७ महिन्यांपासून फरार असलेल्या एका विधीसंघर्षित बालकास पुणे शहर गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने ताब्यात घेतले आहे. २० जानेवारीला गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस अधिकारी व अंमलदार वरिष्ठांच्या आदेशानुसार पर्वती, अलंकार व नऱ्हे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली. पौड पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर अन्वये दाखल असलेल्या खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील विधीसंघर्षित बालक हा दत्तवाडी परिसरात राहत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने साईनिवास समोर, लेन नं. १, पागल गल्ली, भंडारी हॉटेलच्या मागे दत्तवाडी येथे सापळा रचून सदर बालकास शिताफीने ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिली असून तो रेकॉर्डवरील असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) पुणे शहर पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त निखील पिंगळे, सहा. पोलीस आयुक्त विजय कुंभार व वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने केली आहे.

### सुजाण नागरिकामुळे कुटुंबाला मिळाले लाखो रुपयांचे दागिने परत

**पुणे, ता. २२ :** श्रद्धेच्या ओढीने आळंदीकडे निघालेल्या एका कुटुंबासाठी हा प्रवास एका मोठ्या संकटाची चाहूल घेऊन आला होता. मात्र, एका सुजाण नागरिकाची सतर्कता आणि महाळुंगे वाहतूक पोलिसांच्या तत्परतेमुळे, गहाळ झालेले लाखो रुपयांचे दागिने काही तासांतच पुन्हा मूळ मालकाला मिळाले. कोपरगाव येथील कुटुंब दर्शनासाठी आळंदीकडे निघाले होते. प्रवास लांबचा असल्याने आळंदी फाट्याजवळ त्यांनी नाश्त्यासाठी विश्रांती घेतली. याच घाईगडबडीत बॅग गाडीतून उतरताना रस्त्यावर पडली. या बॅगेत दोन तोळे सोन्याचे दागिने, चांदीचे पैंजण आणि रोख रक्कम असा मौल्यवान ऐवज होता. बॅग हरवल्याचे भान नसलेले कुटुंब नाश्ता करून निघून गेले. रस्त्यावर पडलेली बॅग एका प्रामाणिक नागरिकाला सापडली, त्यांनी ती तात्काळ कर्तव्यावर असलेल्या पीएसआय नामदेव गाडे यांच्याकडे सोपवली. पोलिसांनी वेळ न घालवता बॅगेची तपासणी केली. सुदैवाने, बॅगेत एक 'व्हिजिटिंग कार्ड' सापडले, जे या तपासाचा टर्निंग पॉईंट ठरले. त्या आधारे पोलीस निरीक्षक नीलेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सतीश रोकडे यांच्याशी संपर्क साधला. जेव्हा रोकडे यांना फोन आला, तेव्हा कुठे त्यांना आपली बॅग गहाळ झाल्याचे समजले.

### कोंढव्यात तरुणाला लुटले

**कोंढवा, ता. २२ :** पादचारी तरुणाला शस्त्राचा धाक दाखवून त्याला लुटण्यात आल्याची घटना कोंढवा परिसरात घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका तरुणाने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण कोंढव्यातील पिसोळी भागात राहायला आहे. गेल्या महिन्यात तो कोंढव्यातील कौसरबाग परिसरातून निघाला होता. त्या वेळी कौसरबाग परिसरात त्याला दोन चोरट्यांनी त्याला अडवले. तरुणाला शस्त्राचा धाक दाखविण्यात आला. तरुणाला जिवे मारण्याची धमकी देऊन चोरट्यांनी त्याच्याकडील मोबाइल संच, चांदीचे कडे काढून घेतले. तरुणाला धमकावून त्याच्याकडून दहा हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने चोरट्यांनी स्वत:च्या खात्यात जमा करुन घेतले. या घटनेनंतर तरुण घाबरला होता. त्याने पोलिसांकडे नुकतीच तक्रार दिली. पोलिसांनी कौसरबाग परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, पसार झालेल्या चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे. पोलीस उपनिरीक्षक खराडे तपास करत आहेत.

# पुणे, मुंबईसह २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाची आरक्षण सोडत जाहीर

**मुंबई, ता. २२ :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठीची आरक्षण सोडत गुरुवारी (२२ जानेवारी) जाहीर करण्यात आली. मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूरसह प्रमुख शहरांमध्ये महापौरपद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव राहणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. ओबीसी, अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), महिला किंवा खुला प्रवर्ग यापैकी नेमके कोणासाठी आरक्षण निघणार, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता आणि तणाव होता. अखेर याबाबतची अंतिम यादी समोर आली आहे.




जाहीर झालेल्या आरक्षणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापौरपद खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. ठाणे महानगरपालिकेत अनुसूचित जाती, तर कल्याण-डोंबिवलीत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. नवी मुंबई, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पुणे, नाशिक आणि नागपूर येथे खुल्या प्रवर्गाला संधी मिळाली आहे.

भिवंडी-निजामपूर आणि पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकांमध्ये महापौरपद खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव आहे. उल्हासनगर, कोल्हापूर, इचलकरंजी आणि पनवेल येथे ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण लागू झाले आहे. अकोला आणि अहिल्यानगर (अहमदनगर) येथे ओबीसी महिलांसाठी, तर चंद्रपूर आणि जळगाव येथे ओबीसी महिला आरक्षण जाहीर झाले आहे. लातूर आणि जालना या महानगरपालिकांमध्ये अनुसूचित जातीतील महिलांसाठी महापौरपद राखीव ठेवण्यात आले आहे. नांदेड-वाघाळा, परभणी, मालेगाव आणि धुळे या महापालिकांमध्ये खुल्या प्रवर्गासाठी आरक्षण आहे. काही महानगरपालिकांबाबत स्वतंत्र अधिसूचना प्रसिद्ध होणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या सोडतीनंतर राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी १७ ठिकाणी खुल्या प्रवर्गातील महापौर असतील, तर ८ महानगरपालिकांमध्ये ओबीसी प्रवर्गातील महापौर होणार आहेत. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी यंदा महिला आरक्षण लागू नसल्याचेही स्पष्ट झाले आहे. महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता प्रत्येक शहरात महापौरपदासाठी कोणाची निवड होणार, याकडे नागरिकांसह राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. आरक्षण निश्चित झाल्याने आता महापौरपदाच्या दावेदारीसाठी राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

### पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी खुला महिला प्रवर्ग राखीव

पुणे महानगरपालिकेच्या आगामी महापौरपदासाठी खुला महिला प्रवर्ग राखीव ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पुण्याला पुढील महापौर खुल्या प्रवर्गातील महिला असणार हे स्पष्ट झाले आहे. महापौरपदासाठी सध्या चार महिला नगरसेविकांची नावे जोरदार चर्चेत आहेत. यामध्ये रंजना टिळेकर, मंजुषा नागपुरे, मानसी देशपांडे व रोहिणी चिमटे यांचा समावेश आहे.

### पुण्यात पत्नीकडून पतीचा छळ

**पुणे, ता. २२ :** लग्नाला २५ वर्षे झाली म्हणून अत्याचार सहन करावेच लागतील असे नाही, असा जणू संदेश देत पुणे कौटुंबिक न्यायालयाने एका ५३ वर्षीय पतीला पत्नीकडून होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक छळापासून मुक्त केले आहे. दाम्पत्याचा घटस्फोट मंजूर करताना न्यायालयाने 'क्रूरता' हा महत्त्वाचा आधार ग्राह्य धरला.

१९९६ मध्ये शुभम आणि सुप्रिया (नावे बदललेली) मध्ये दोघांचे लग्न झाले होते. सुरुवातीची वर्षे सुखात गेली, मात्र त्यानंतर संसाराला उतरती कळा लागली. पतीने न्यायालयात मांडलेल्या व्यथेनुसार, पत्नी केवळ किरकोळ कारणावरून वाद घालत नव्हती, तर ती स्वत:ला इजा करून आत्महत्येचा प्रयत्न करायची. पतीला मानसिक दडपणाखाली ठेवण्यासाठी हे 'शस्त्र' वापरले जात होते. त्यातच, पत्नीचे विवाहबाह्य संबंध असल्याचे पुरावे समोर आल्यावर हे नाते टिकवणे अशक्य झाले आणि पती शुभम यांनी ॲड. राणी कांबळे-सोनावणे यांच्यामार्फत कायदेशीर लढा सुरू केला.

# मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी दिग्विजय पाटलांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**पुणे, ता. २२ :** पुणे शहरातील मुंढवा भागातील शासकीय जमिनीच्या गैरव्यवहार प्रकरणात अमेडिया एंटरप्रायजेस एलएलपी कंपनीचा संचालक दिग्विजय पाटील याला मोठा धक्का बसला आहे. सत्र न्यायालयाने त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळत या प्रकरणात गंभीर स्वरूपाचे आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी या टप्प्यावर आरोपीला दिलासा देणे योग्य ठरणार नाही, असे नमूद करत हा अर्ज नामंजूर केला.




या प्रकरणाची पार्श्वभूमी पाहिली तर मुंढवा परिसरातील सुमारे ४० एकर शासकीय जमीन अनियमितपणे खासगी कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आल्याचा आरोप आहे. ही जमीन अमेडिया एंटरप्रायजेस कंपनीने सुमारे ३०० कोटी रुपये देऊन खरेदी केल्याचा व्यवहार समोर आला आहे. या कंपनीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे भागीदार असल्यामुळे प्रकरणाला राजकीय व सामाजिक महत्त्वही प्राप्त झाले आहे.

या व्यवहारात मुख्य आरोपी शीतल तेजवानीसह दिग्विजय पाटील आणि तत्कालीन सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांच्यावर बावधन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीच तेजवानीचा जामीन अर्ज पौड न्यायालयाने फेटाळला होता.

दिग्विजय पाटील यांच्यावतीने सत्र न्यायालयात असा युक्तिवाद करण्यात आला की त्यांनी तपासात सहकार्य केले असून तीन वेळा तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहिले आहेत. त्यांनी कोणतीही फसवणूक केलेली नाही किंवा बनावट कागदपत्रे तयार केलेली नाहीत, त्यामुळे पोलिस कोठडीतील चौकशीची गरज नाही. मात्र, सरकार पक्षाने या व्यवहारात राज्य सरकारची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचा दावा करत आरोपींच्या बँक खात्यांची तपासणी आणि साक्षीदारांचे जबाब सुरू असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

### प्रेमसंबंधातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार

**पुणे, ता. २२ :** प्रेमसंबंधातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना मुंढवा भागात घडली. या प्रकरणी टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.




प्रवीण धनंजय माने (वय-२४, रा. श्रीमाननगर, शेवाळवाडी, पुणे-सोलापूर रस्ता) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत माने याने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माने याचे एका तरुणीशी प्रेमसंबध आहे. आरोपीने माने याला तरुणीशी असलेले प्रेमसंबध तोडण्यास सांगितले होते. १९ जानेवारी रोजी माने याला मुंढव्यात बोलावून घेतले. आरोपी बरोबर असलेल्या साथीदारांनी माने याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. पोलिसांकडे तक्रार दिल्यास जिवे मारु, अशी धमकी देऊन आरोपी पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. माने याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पसार झालेल्या मुख्य आरोपीला पोलिसांनी अटक केली. त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांचा शोध घेण्यात येत आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक पिंगुवाले तपास करत आहेत.

## बारामतीच्या कृषी प्रदर्शनात चक्क एक किलोचा एक कांदा

**बारामती, ता. २२ :** सामान्यतः एका किलोमध्ये १० ते १२ कांदे बसतात, पण बारामतीच्या 'कृषिक' प्रदर्शनात सध्या असा एक कांदा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. हा कांदा साधासुधा नसून तो मूळचा 'नेदरलँड'चा आहे. एकच कांदा तब्बल एक किलोचा भरतो. विज्ञानाची प्रगती आणि निसर्गाची किमया यांचा हा अजब संगम पाहण्यासाठी राज्यभरातील शेतकऱ्यांनी प्रदर्शनात मोठी गर्दी केली आहे.





बारामतीच्या मातीत या परदेशी कांद्याचे यशस्वी उत्पादन घेण्यात आले आहे. या कांद्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे वजन हे आहे. शेतकरी हा कांदा दीर्घकाळ साठवून ठेवू शकतात. भारतीय शेतकऱ्यांसमोर कांदा साठवणुकीचा मोठा प्रश्न असतो. हा नवीन कांदा ते महिने इतका प्रदीर्घ काळ टिकून राहू शकतो. तसेच, केवळ एका किलो बियाण्यामध्ये संपूर्ण एक एकर क्षेत्रावर लागवड करता येत असल्याने बियाण्यांचा खर्चही वाचणार आहे. रंगाने गडद लाल आणि आकाराने मोठा असलेला हा कांदा पाहताना डोळ्यांवर विश्वास बसत नाही.

या विक्रमी उत्पादनामागे केवळ बियाणे नाही, तर आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठा वाटा आहे. ही लागवड चक्क कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर करण्यात आली आहे. पिकाला लागणारे पाणी, खते आणि हवामानातील बदल यांचा अचूक अंदाज एआय तंत्रज्ञानाने घेतल्यामुळे कांद्याची एवढी भव्य वाढ होणे शक्य झाले आहे. नव्या युगातील हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांचा खर्च कमी करून उत्पादन कसे वाढवू शकते, याचे हे जिवंत उदाहरण आहे.

## इलेक्ट्रिक वाहनांच्या 'सायलेंट' क्रांतीला ब्रेक

**पुणे, ता. २२ :** पुण्यातील 'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया'ने विद्युतवाहनात बदल करण्यात येणार असून सुरक्षेच्या दृष्टीने पाऊल उचलले जात आहेत. आगामी काळात ई-वाहनांमध्ये कृत्रिम आवाजाची प्रणाली बसवणे अनिवार्य केले आहे. इलेक्ट्रिक वाहनांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे 'सायलेंट' असणे. ही वाहने जवळ कधी येतात, याचा पत्ता लागत नाही. या बदलाचा अर्थ असा की, भविष्यात तुमची इलेक्ट्रिक कार किंवा दुचाकी पूर्णपणे शांत राहणार नाही.




विशेषतः गर्दीच्या ठिकाणी किंवा वळणांवर आवाज न आल्यामुळे अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. हीच त्रुटी दूर करण्यासाठी 'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया'ने 'ॲकॉस्टिक व्हेइकल अलर्टिंग सिस्टीम' विकसित केली आहे. ही प्रणाली वाहनाचा वेग कमी असताना एक विशिष्ट 'इलेक्ट्रॉनिक ध्वनी' निर्माण करेल, ज्यामुळे आसपासच्या लोकांना सावध होता येईल. पुण्यात २७ ते ३० जानेवारी दरम्यान आयोजित 'SIT २०२६' या आंतरराष्ट्रीय परिषदेत या तंत्रज्ञानाचे जागतिक सादरीकरण केले जाणार आहे. केवळ आवाजापुरतेच मर्यादित न राहता, 'ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया'ने आता आयआयटी-दिल्लीच्या मदतीने हवेच्या गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामांचेही संशोधन करत आहे.

दरम्यान, चारचाकी वाहनांसाठीच्या चाचण्या यशस्वी झाल्या असून, ऑक्टोबर २०२६ पासून याची अधिकृत अंमलबजावणी सुरू होईल. सध्या दुचाकी आणि तीनचाकी वाहनांसाठीही चाचण्यांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

## शिंदे गटाचे नेते अनिल लोखंडे यांच्याकडून सुनेचा पैशांसाठी छळ

**पुणे, ता. २२ :** सत्ताधारी पक्षाशी संबंध आहेत म्हणून आरोपींना कायद्याचा धाक उरला नाहीये का? असा संतप्त सवाल करत मुंबई उच्च न्यायालयाने पुणे पोलिसांच्या कामावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. खेडमधील शिवसेना (शिंदे गट) नेते अनिल लोखंडे आणि त्यांच्या कुटुंबाचा अटकपूर्व जामीन फेटाळताना न्यायालयाने अत्यंत गंभीर निरीक्षणे नोंदवली आहेत.




ऑगस्ट २०२३ मध्ये अनिल लोखंडे यांचा मुलगा आदित्य याचा विवाह झाला. या लग्नात मुलीच्या वडिलांनी तब्बल २ कोटी रुपये खर्च केले होते, ज्यात ५५ तोळे सोने आणि 'फॉर्च्युनर' कारचा समावेश होता. मात्र, हव्यास तिथेच थांबला नाही. शेअर बाजारात झालेल्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी सासरच्या मंडळींनी सुनेकडे पुन्हा १०० तोळे सोने आणि आलिशान कारसाठी तगादा लावला.

पीडितेने सांगितले कि, मागणी पूर्ण होत नाही हे पाहून, गरम तव्यावर हात ठेवून भाजणे, केस धरून बेदम मारहाण करणे आणि खुद्द सासऱ्यांनी (राजकीय नेता) पिस्तुल दाखवून जीवे मारण्याची धमकी देणे, असे कृत्य केले. पतीच्या वाढदिवसालाही ४ तोळ्याचे सोन्याचे कडे आणि रोख रकमेसाठी सुनेचा छळ करण्यात आला.

न्यायमूर्ती माधव जामदार यांनी या प्रकरणातील 'पॉलिटिकल कनेक्शन'वर बोट ठेवले. सत्र न्यायालयाने १५ डिसेंबर २०२५ रोजीच या सर्वांचा जामीन फेटाळला होता. नियमानुसार पोलिसांनी त्यांना तात्काळ अटक करायला हवी होती. मात्र, महिना उलटूनही आरोपी मोकाट आहेत. आरोपी राजकीयदृष्ट्या प्रभावशाली असल्यानेच पोलीस कारवाई करत नसल्याचे दिसत आहे, असे खडे बोल न्यायालयाने सुनावले.

# अखेर इंदापूर मोजणी कार्यालयातील मुजोर मुख्यालय सहाय्यक निलंबित

## उपसंचालक विष्णू शिंदे यांनी कुलकर्णींना दाखवला घरचा रस्ता

**संदीप बोडके**

पुणे, ता. २२ : गमंत म्हणून नोकरी करतो, खानदानी पैशावाला आहे, वेळेला दहा वीस लाख सहज टाकतो असे बेताल वक्तव्य करून नागरिकांशी मुजोरपणाने वागून दबावतंत्र तयार करणा-या मुख्यालय सहाय्यकाला अखेर शासनाने तडकाफडकी निलंबित केले आहे.

इंदापूर उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील मुख्यालय सहाय्यक विवेकानंद कुलकर्णी असे त्यांचे नाव असून भूमी अभिलेख विभागाची प्रतिमा मलीन केल्याने भूमी अभिलेख विभागाचे पुणे प्रदेशचे उपसंचालक विष्णू शिंदे यांनी निलंबनाचे आदेश पारीत करत कुलकर्णी यांना चांगलाच झटका दिला आहे. निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय आजरा जिल्हा कोल्हापूर येथील कार्यालय असून त्यांनी निलंबन कालावधीत कोणतीही नोकरी, धंदा अथवा व्यापार करू नये असे स्पष्ट निलंबन आदेश उपसंचालक विष्णू शिंदे यांनी पारित केले आहे. शेटफळगढे (तालुका इंदापूर) येथील अर्जदार शेतकरी संतोष रकटे यांनी विवेकानंद कुलकर्णी यांचा नागरिकांशी उद्धटपणे वागणूकीचा व्हिडिओ व्हायरल करत तक्रार केली होती. त्यामुळे इंदापूर भूमी अभिलेख कार्यालयातील गैर कारभाराची



अब्रूची लक्तरे व्हायरल झाल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेतली आहे. अर्जदार संतोष रकटे यांनी मौजे शेटफळगढे येथील गट नबंर २५२ वरील अतितातडी मोजणी रजिस्टर नंबर प्रकरण ५८१७/२०२१चे मूळ संपूर्ण प्रकरण केस नक्कल, जाबजबाब, अ ब क प्रतिसह नकलांची मागणी अर्जाद्वारे केली होती. सदर अर्जाची प्रत कार्यालय प्रमुख उप अधिक्षकांना व्हाटसअपवर पाठवली होती. मला न भेटता वरिष्ठ अधिका-यांना मेसेज करता, नेमका याचाच राग मनात धरुन मुख्यालय सहाय्यक कुलकर्णी यांचा इगो हर्ट झाल्याने त्यांनी कार्यालयात आकांडतांडव करत गैरप्रकार केला होता. अर्जदाराने त्यांच्या गैरप्रकाराचा पंचनामा व्हिडिओद्वारे व्हायरल केला आहे.

तुम्हाला कुठे जायचे आहे, तेथे जा, मी घाबरणार नाही. मी पळसदेवचा राहणार आहे. मला नोकरीची गरज नाही, माझा साडेसतरा एकर ऊस आहे व साडेसतरा एकर केळी आहे. मी गंमत म्हणून नोकरी करतो. तुमचा अर्ज साहेबांना पाठवा अन्यथा कोणालाही पाठवा, माझे शेटफळला पाहुणे आहेत. असे कुलकर्णी यांचे बेताल वक्तव्य व्हायरल झाल्याने इंदापूर भूमी अभिलेख कार्यालयाचा गैरप्रकार चव्हाट्यावर आला आहे.

> इंदापूर भूमी अभिलेख कार्यालयात अरेरावी वाढली आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. कुलकर्णी यांचे निलंबन केले असले तरी त्यांचेवर कडक फौजदारी स्वरूपाची कारवाई होणे गरजेचे आहे. कुलकर्णी यांनी शासकीय कार्यालयात गुटखा खाल्ला आहे त्याचा पुरावा माझ्याकडे आहे. तसेच कुलकर्णी यांनी नशापानी केले होते, पोलिस येण्यापूर्वीच ते गायब झाले. त्यामुळे त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे.
> - **संतोष रकटे** तक्रारदार

जनमानसाचा निडर आवाज...
पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# महापौर पदाच्या लॉटरीवर उद्धव ठाकरे गटाचा आक्षेप

**मुंबई, ता. २२ :** महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाची आरक्षण सोडत आज काढण्यात आली. या सोडतीवर आता शिवसेनेकडून (ठाकरे) आक्षेप घेण्यात आला आहे. शिवसेनेच्या (ठाकरे) माजी महापौर आणि विद्यमान गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी या लॉटरी (सोडत) प्रक्रियेवर आक्षेप घेतला असून त्याचा धिक्कार केला आहे.



सोडतीनंतर माध्यमांशी बोलत असताना किशोरी पेडणेकर म्हणाल्या, मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या आरक्षणासाठी महिला ओबीसी प्रवर्गाची चिठ्ठी टाकलेली नाही. २०१७ आणि २०२२ साली महापौरपदाचे आरक्षण खुल्या गटाचे होते. आतापर्यंत महिला ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण पडलेले नाही. हा ओबीसींवर अन्याय आहे.

निवडणूक व्हायच्या आधी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी किती ठिकाणी आरक्षण असायला हवे, हा नियम बनवायला हवा होता. मात्र निवडणुकीनंतर आता अनुसूचित जमातीचे तीन किंवा त्यापेक्षा अधिक नगरसेवक असतील तरच आरक्षण असले पाहिजे, असा नियम बनवण्यात आला आहे. हे जाणूनबुजून केलेले आहे. मुंबई महानगरपालिकेत अनुसूचित जमातीमधून दोन नगरसेवक निवडून आले असून ते शिवसेनेचे (ठाकरे) आहेत. याचा अर्थ लॉटरी ठरवून केलेली आहे. या लॉटरी आणि निवडणूक प्रक्रियेचा आम्ही निषेध करतो, असेही किशोरी पेडणेकर म्हणाल्या.

दरम्यान, किशोरी पेडणेकर यांनी पुढे आरोप केला की, सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ पाहून सोडत काढण्यात आलेली आहे. सत्ताधाऱ्यांनी ओबीसी, अनुसूचित जाती आणि जमातींवर अन्याय केला आहे. निवडणुकीआधी आरक्षण ठरवायला हवे होते. पण आता सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ पाहून ठरविण्यात येत आहे. मुंबई महानगरपालिकेत एसटी प्रवर्गाचे दोन नगरसेवक आहेत, म्हणून त्यांना न्याय द्यायचा नाही का?

# अटल पेन्शन योजनेत पाच वर्षांसाठी मुदतवाढ

**मुंबई, ता. २२ :** वृद्धापकाळातील आर्थिक सुरक्षितता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने राबवलेली अटल पेन्शन योजना (एपीवाय) आणखी पाच वर्षांसाठी वाढवण्यात आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार ही योजना आता २०३०-३१ या आर्थिक वर्षाअखेर, म्हणजेच २०३१ पर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे अद्याप या योजनेत सहभागी न झालेल्या नागरिकांसाठी ही एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

बुधवारी (२१ जानेवारी) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अटल पेन्शन योजनेला मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासोबतच योजनेच्या प्रचार, जनजागृती आणि विकासात्मक उपक्रमांसाठी निधी वाढवण्याचा तसेच गॅप फंडिंगमध्ये वाढ करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. अधिकाधिक नागरिकांना या योजनेत सहभागी करून




वृद्धापकाळातील उत्पन्न सुरक्षा मजबूत करणे, हा सरकारचा प्रमुख उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेषतः शेतकरी, ग्रामीण भागातील नागरिक तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांना या निर्णयाचा मोठा फायदा होणार आहे. केंद्र सरकारची ही सामाजिक सुरक्षा योजना सध्या देशभरात लाखो लोकांसाठी आधार ठरत आहे.

२०१५ मध्ये सुरुवात केंद्र सरकारने ९ मे २०१५ रोजी अटल पेन्शन योजना सुरू केली. असंघटित क्षेत्रातील कामगार, लहान शेतकरी, मजूर आणि स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींना वृद्धापकाळात निश्चित आणि नियमित पेन्शन मिळावी, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. १९ जानेवारी २०२६ पर्यंत देशभरात ८६.६ दशलक्षांहून अधिक नागरिकांनी या योजनेत नोंदणी केल्याची माहिती समोर आली आहे.

**योजनेचे स्वरूप**

अटल पेन्शन योजना ही सरकार समर्थित पेन्शन योजना असून, लाभार्थ्याला वयाच्या ६० वर्षांनंतर दरमहा १,००० ते ५,००० रुपयांपर्यंत निश्चित पेन्शन मिळते. पेन्शनची रक्कम लाभार्थ्याने निवडलेल्या पर्यायावर अवलंबून असते. लाभार्थ्याच्या मृत्यूनंतर ही पेन्शन त्यांच्या पती किंवा पत्नीस दिली जाते. दोघांच्याही मृत्यूनंतर जमा झालेली संपूर्ण रक्कम नामनिर्देशित व्यक्तीला परत केली जाते.

**अर्ज कसा कराल?**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ४० वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते असणे बंधनकारक असून आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक खात्याशी लिंक असणे आवश्यक आहे. निवडलेल्या पेन्शन रकमेप्रमाणे व वयानुसार ठराविक मासिक योगदान द्यावे लागते, जे ऑटो-डेबिट पद्धतीने खात्यातून वसूल केले जाते. इच्छुक नागरिक जवळच्या बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन अटल पेन्शन योजनेसाठी अर्ज करू शकतात.

दरम्यान, अटल पेन्शन योजनेला मिळालेल्या या मुदतवाढीमुळे असंघटित क्षेत्रातील नागरिकांसाठी दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेचा मार्ग अधिक मजबूत झाला आहे.

**पात्रता निकष**

१) अर्जदार भारतीय नागरिक असावा
२) वय १८ ते ४० वर्षांच्या दरम्यान असावे
३) बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते असणे आवश्यक
४) ईपीएफ, ईपीएस किंवा इतर कोणत्याही सरकारी पेन्शन योजनेचा लाभार्थी नसावा
५) आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक लिंक असणे बंधनकारक

# बोरिपार्धी–केडगाव गटात दोन ‘माजी आमदारांचे’ वारसदार भिडणार

**संदिप टूले**

दौंड, ता. २२ : दौंड तालुक्यातील बोरिपार्धी- केडगाव गटाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून या गटामध्ये माजी आमदार रमेश थोरात यांच्या गटाकडून त्यांचे पुत्र तुषार (गणेश) थोरात यांचे नाव जवळपास निश्चित झाले असून दौंड चे विद्यमान आमदार राहुल कुल यांच्या गटाकडून सहकार महर्षी माजी आमदार कै.काकासाहेब थोरात यांचे नातू आणि भीमा पाटस चे माजी उपाध्यक्ष आनंद थोरात यांचे चिरंजीव अभिषेक थोरात यांचे नाव ही निश्चित झाले आहे. त्यामुळे दोन माजी आमदार थोरात घराण्यातील पुत्र व नातवामध्ये लढत होत असल्याकारणाने दोन्ही गटांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.




बोरिपार्धी - केडगाव जिल्हा परिषद गटामध्ये केडगाव, बोरिपार्धी, पडवी, खोर, देऊळगाव गाडा, खुटबाव, एकेरीवाडी, या गावांचा समावेश असून आरक्षण जाहीर होताच माजी आमदार रमेश थोरात यांच्या गटाने मोठा जल्लोष करत तुषार थोरात हे एकतर्फी निवडून येतील असा विश्वास व्यक्त करत होते. कारण त्यांना या गटामध्ये त्या ताकतिचा विरोधी गटात उमेदवार नाही असा समज झाला होता पण आमदार राहुल कुल यांनी राजकीय खेळी करत माजी आमदार काकासाहेब थोरात यांच्या नातवाला अभिषेक थोरात यांना रिंगणात उतरवत उमेदवारी जाहीर करताच ही निवडणूक वाटते तितकी सोपी नाही हेही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील थोरात गटाला कळून आले आहे . त्यामुळे माजी आमदार रमेश थोरात यांच्या गटाने कंबर कसून गटामध्ये बैठकांना सुरुवात केली आहे.

तसे पाहता पंचायत समिती केडगाव गण हा माजी आमदार रमेश थोरातयांचा बालेकिल्ला आहे. कारण या गणमध्ये खुटबाव, एकेरीवाडी, केडगाव च काही भाग यामध्ये माजी आमदार यांना मानणारा मोठा वर्ग असून या गणातून ज्याला उमेदवारी मिळेल त्याची विजयाची शक्यता जास्त असल्याकारणाने या गणातून इच्छुकांची संख्याही मोठी होती. पण यामध्ये या गणात युवा धनंजय शेळके यांचे नाव निश्चित झाले असून इतर इच्छुकांनी त्यांना पाठिंबा दर्शविला आहे. तर भाजपकडून या गणमध्ये आशिष शेळके यांची उमेदवारी निश्चित झाली आहे.

तर बोरिपार्धी गणांमध्ये बोरीपारधी हे गाव आनंददादा थोरात यांना मानणारा मोठा वर्ग असून त्यांना आता भाजपची ही ताकत मिळाली असून त्याचा यांना नक्कीच फायदा होणार आहे. तर या बोरीपारधी गणा मधे राष्ट्रवादी गटाकडून खोर येथील उज्वला चौधरी यांना उमेदवारी देण्यात आली आहे तर भाजपा कडून रेखा चौधरी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# कामगारांना अडवून मोबाईल लूट करणाऱ्या ३ आरोपींना दोन तासाच्या आत अटक

**अमित मुंडीक**

रांजणगाव, ता. २२ : रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत कामगारांना रस्त्यावर अडवून मोबाईल लूट करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी अवघ्या दोन तासांत पर्दाफाश केला आहे. १४ जानेवारीला सायंकाळी साडेसातच्या सुमारास स्वामी समर्थ मंदिरासमोरून जात असताना सुरेश मलाबाई पास्मीत (रा. पावामोडी, ता. सांभावाडा, जि. म्हैसागर, गुजरात) यांना तीन अज्ञात आरोपींनी पॅशन प्रो मोटारसायकलवर येत रस्त्यात अडवले. शिवीगाळ व दमदाटी करून त्यांच्याकडील सुमारे ९ हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेतला आणि तेथून पसार झाले. या प्रकरणी



संजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता तपास पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन फिर्यादीने दिलेल्या वर्णनानुसार तसेच परिसरातील नागरिकांकडून माहिती घेत आरोपींचा शोध सुरू केला. गोपनीय माहिती व कौशल्यपूर्ण तपासाच्या आधारे पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले. अटक केलेल्या आरोपींकडून गुन्ह्यात चोरी गेलेला मोबाईल तसेच इतर ५ मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरलेली पॅशन प्रो मोटारसायकल असा एकूण सुमारे १ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे निलेश चंद्रकांत पवार (वय २८, रा. भोंदे कांडर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर), मोडल विठ्ठल भोगे (वय २८, रा. प्रीतम प्रकाशनगर, शिरूर, जि. पुणे) आणि अभिजीत चंद्रकांत पवार (वय ३५, रा. हिवसमाव पठार, ता. संगमनेर, जि. पुणे) अशी आहेत. आरोपींनी मोबाईल चोरीची कबुली दिली असून संजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनमधील एकूण दोन गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. चोरीस गेलेले मोबाईल परत मिळाल्याने एमआयडीसीतील कामगारांनी समाधान व्यक्त केले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# लोणी काळभोर गटात शिवसेनेकडून सिंपल कांबळेसह तीन उमेदवार रिंगणात

**लोणी काळभोर, ता. २२:** लोणी काळभोर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी शिवसेना (शिंदे गट) कडून तीन उमेदवारांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून त्यामुळे या गटातील राजकीय समीकरणे अधिकच रंगतदार बनली आहेत. शिवसेनेकडून लोणी काळभोर जिल्हा परिषद गटासाठी सिंपल गणेश कांबळे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून विजय भागवत दाभाडे, तर लोणी काळभोर पंचायत समिती गणातून नंदिनी कोळपे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.




लोणी काळभोर जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जातीसाठी (महिला) राखीव असल्याने या जागेकडे सर्वच पक्षांचे विशेष लक्ष लागले आहे. भाजपकडून लोणी काळभोर जिल्हा परिषद गटासाठी पूनम बाबुराव गायकवाड, लोणी काळभोर पंचायत समिती गणासाठी श्वेता कमलेश काळभोर, तर कदम वाकवस्ती पंचायत समिती गणासाठी ज्ञानेश्वर नामुगडे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून लोणी काळभोर जिल्हा परिषद गटासाठी शीतल कांबळे, लोणी काळभोर पंचायत समिती गणासाठी रेश्मा काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणासाठी अमोल टेकाळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

या गटात आघाडीही उतरण्याची दाट शक्यता वर्तवली जात असून आघाडीकडून लोणी काळभोर जिल्हा परिषद गटासाठी अनिता सूर्यकांत गवळी, लोणी काळभोर पंचायत समिती गणासाठी सुवर्णा काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणासाठी प्रकाश नारायण भिसे यांची नावे चर्चेत आहेत. शिवसेना (ऊबाठा) गटाकडून कलावती धेले यांनी उमेदवारी जाहीर झाली आहे. तर अपक्ष उमेदवार म्हणून नितीन लोखंडे व राहुल जोगदंड यांनीही निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली असून त्यामुळे ही लढत बहुरंगी होण्याची चिन्हे दिसत आहेत. पंचायत समिती गणांमध्येही तसाच संघर्ष दिसत आहे. लोणी काळभोर व कदम वाकवस्ती या दोन्ही गणांमध्ये प्रमुख पक्षांचे अधिकृत उमेदवार असल्याने मतांचे विभाजन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच पार्श्वभूमीवर आघाडी होण्याची चर्चा सुरू असून, आघाडी प्रत्यक्षात आली तर ही लढत पूर्णत: वेगळ्या वळणावर जाऊ शकते. अपक्ष उमेदवार नितीन लोखंडे व राहुल जोगदंड यांनीही निवडणूक रिंगणात उडी घेतल्याने प्रमुख पक्षांची डोकेदुखी वाढली आहे.


हे अपक्ष उमेदवार कोणाच्या मतांवर परिणाम करतात, यावरच अंतिम निकालाचे गणित ठरणार आहे. दरम्यान, आज सुरू असलेल्या उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर कोणाचे अर्ज वैध ठरतात, कोण बाद होतात आणि कोण माघार घेतात, यावरच लोणी काळभोर गटातील निवडणुकीचे अंतिम राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत लोणी काळभोर गटातील राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची चिन्हे आहेत.

## मोलकरणीने घरातील दागिन्यांवर मारला डल्ला

**पुणे, ता. २२ :** सध्याच्या धावपळीच्या युगात आपण भाजीपाल्यापासून ते थेट घरकाम गारापर्यंत प्रत्येक गोष्ट मोबाईलच्या एका 'क्लिक'वर शोधतो. पण हाच शॉर्टकट पुण्याच्या एका महिलेसाठी मोठा मनस्ताप घेऊन आला आहे. पवरून मोलकरीण शोधन महिलेला इतके महागात पडले की, घरातील मौल्यवान दागिने गमावण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

पुण्यातील एका उच्चशिक्षित महिलेने मोलकरीण शोधण्यासाठी एका प्रसिद्ध मोबाईल पचा आधार घेतला. सुरुवातीला काही महिने महिलेने अत्यंत प्रामाणिकपणे काम करून घरमालकीणचा पूर्ण विश्वास संपादन केला. घरचे लोक ज्यावेळी तिच्यावर पूर्ण विसंबून राहिले, नेमकी तीच संधी साधून या चोरटीने कपाटातील सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारला आणि तिथून पोबारा केला. चोरी झाली हे लक्षात आल्यावर तक्रारदार महिलेची मोठी गोची झाली.

प्राईम लाईफ



## हिवाळ्यात कांद्याची पात का खायला हवी, जाणून घ्या

हिवाळा सुरु होताच बाजारामध्ये हिरव्यागार पालेभाज्या आपल्याला दिसू लागतात. यामध्ये कांद्याची पात आपलं लक्ष वेधून घेते. कांद्याची पात ही आयुर्वेदाच्या दृष्टीने फार महत्त्वाची मानली जाते. कांद्याची पात संसर्गाशी लढणाऱ्या अँटीबॅक्टेरियल गुणधर्मानी समृद्ध असते. मुख्य म्हणजे ही भाजी फुफ्फुसांच्या आरोग्यासाठी देखील अतिशय उत्तम मानली जाते. हिवाळ्याच्या काळात शरीराला अंतर्गत उष्णता प्रदान करण्यासाठी एक रामबाण उपाय आहे.

कांद्याच्या पातीमध्ये नैसर्गिकरित्या बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि अँटीव्हायरल गुणधर्म असतात. म्हणूनच हिवाळ्यामध्ये ही भाजी खाणे हे अतिशय उत्तम मानले जाते.

कांद्याच्या पातीमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. यामुळे पांढऱ्या रक्त पेशींची संख्या वाढवून शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. श्वसनमार्गातील जळजळ कमी करण्यास आणि फुफ्फुसातील कफ साफ करण्यास ते अत्यंत उपयुक्त आहे.

कांद्याची पात आपल्या हाडांसाठी फार उपयुक्त मानली जाते. या पातींमध्ये व्हिटॅमिन केचा उत्कृष्ट स्रोत असतो. तसेच यामुळे हाडांची घनता वाढते, त्याचबरोबर हाडांना कमकुवत होण्यापासून रोखते.

कांद्याच्या पातीमध्ये ॲलिसिन नावाचे एक शक्तिशाली संयुग असते. हे संयुग रक्तातील खराब कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते. नियमित सेवनाने धमन्या स्वच्छ राहण्यास मदत होते आणि हृदयरोगाचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. हे पचनसंस्थेला देखील बळकटी देते.

दरम्यान, कांद्याची पातीपासून कोणताही पदार्थ करताना ती अधिक प्रमाणात शिजवू नये. कांद्याच्या पातीचा वापर सॅलडमध्ये किंवा सूपमध्ये करता येतो. तसेच गार्निशिंग करण्यासाठी देखील कांद्याची पात ही फार उपयुक्त ठरते.

# अभिषेक शर्मांचा नागपुरात 'धुमाकूळ'! अवघ्या २० चेंडूत ठोकलं अर्धशतक

**पुणे, ता. २२ :** नागपूरच्या मैदानावर भारत-न्यूझीलंड टी-२० मालिकेच्या पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने आक्रमक सुरुवात करत प्रेक्षकांना जबरदस्त मनोरंजन दिलं, आणि या खेळीचा केंद्रबिंदू ठरला तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीतील अव्वल फलंदाज अभिषेक शर्मा. स्फोटक फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या अभिषेकने अवघ्या २० चेंडूंत अर्धशतक झळकावत न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच दबाव आणला.

न्यूझीलंडने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली आणि भारताला फलंदाजीचं आमंत्रण दिलं. सलामीला अभिषेक शर्मा



आणि संजू सॅमसन मैदानात उतरले. पहिल्याच षटकात अभिषेकने आपला इरादा स्पष्ट केला. जेकब डफीच्या षटकातील अखेरच्या चेंडूवर ठोकलेला उत्तुंग षटकार हा येणाऱ्या वादळाचा इशारा होता. मात्र दुसऱ्याच षटकात संजू सॅमसन बाद झाल्याने भारताला पहिला धक्का बसला. काइल जॅमिसनच्या चेंडूवर रचिन रविंद्रकडे झेल देत संजू माघारी परतला.

यानंतर बराच काळानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करणारा इशान किशन क्रीजवर आला. पहिल्याच चेंडूवर चौकार ठोकून त्याने आशा निर्माण केली, पण ही खेळी फार काळ टिकली नाही. डफीच्या गोलंदाजीवर मार्क चॅपमनकडे झेल देत इशान बाद झाला. भारताच्या दोन झटके पडले असले तरी दुसऱ्या बाजूने अभिषेक शर्माचा धडाका सुरूच होता.

अभिषेकने पॉवरप्लेमध्ये चौकार-षटकारांची आतषबाजी करत अवघ्या पाच षटकांत भारताला ५० धावांचा टप्पा ओलांडून दिला. पॉवरप्लेनंतर भारताची धावसंख्या २ बाद ६८ अशी होती. त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने अभिषेकला चांगली साथ दिली. दोघांनी मिळून न्यूझीलंडच्या गोलंदाजीवर वर्चस्व गाजवलं आणि १० षटकांत भारताला ११७ धावांपर्यंत पोहोचवलं.

दरम्यान, या टप्प्यावर अभिषेक शर्मा ६० धावांवर खेळत होता, तर सूर्यकुमार यादव ३१ धावांवर बाद झाला. अवघ्या काही सामन्यांत टी-२० संघाचा कणा बनलेल्या अभिषेकची ही खेळी केवळ आकड्यांपुरती मर्यादित नव्हती, तर ती भारताच्या आक्रमक टी-२० दृष्टिकोनाचं प्रतीक ठरली. मालिकेच्या पहिल्याच सामन्यात दिलेला हा इशारा न्यूझीलंडसाठी पुढील सामन्यांमध्ये नक्कीच डोकेदुखी ठरणार आहे.

## प्रशासनाकडून २० हजार कुटुंबाचे रेशन कार्ड होणार रद्द

**कोल्हापूर, ता. २२ :** शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर तपासणी मोहीम राबवण्यात आली असून त्यातून तब्बल २०३१० रेशनकार्डधारकांचे धान्य वितरण थांबवण्यात आले आहे. या कारवाईत शासकीय सेवेत कार्यरत असलेले कर्मचारी, मागील सहा महिन्यांपासून रेशन न घेणारे लाभार्थी तसेच मृत व्यक्तींच्या नावावरील शिधापत्रिकांचा समावेश आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना आता रास्तभाव दुकानांतून नियमित धान्य मिळणार नाही, अशी माहिती जिल्हा पुरवठा विभागाने दिली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून मोठ्या संख्येने नागरिकांना स्वस्त दरात धान्य दिले जाते. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यानुसार पात्र कुटुंबांना दरमहा गहू, तांदूळ आणि इतर धान्याचा पुरवठा केला जातो. जिल्ह्यात केशरी, पिवळी आणि पांढरी अशा तीन प्रकारच्या शिधापत्रिका आहेत. यामधील केशरी आणि पिवळ्या शिधापत्रिकाधारकांना दरमहा रेशनचे धान्य दिले जाते. तपासणीदरम्यान असे निदर्शनास आले की, काही शिधापत्रिकाधारक शासकीय सेवेत कार्यरत असूनही रेशनचा लाभ घेत होते. काही लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती चांगली असतानाही ते या योजनेत सामील होते. तसेच अनेकांनी सलग सहा महिने किंवा त्याहून अधिक काळ धान्य घेतलेले नव्हते. काही प्रकरणांत मृत व्यक्तींच्या नावावर अजूनही शिधापत्रिका सुरू असल्याचे आढळून आले.

गेल्या काही वर्षांपासून बायोमेट्रिक प्रणालीद्वारे धान्य वितरण होत असल्याने कोणत्या लाभार्थ्याने किती काळ रेशन घेतले नाही, याची स्पष्ट माहिती उपलब्ध झाली आहे.



## पुण्यात ५४ किमीचे भुयारी मार्ग ठरणार वाहतुकीचे 'गेमचेंजर'

**पुणे, ता. २२ :** विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहराला सध्या वाहतूक कोंडीच्या विळख्याने ग्रासले आहे. रस्ते रुंदीकरणाला असलेल्या मर्यादा आणि उड्डाणपुलांसाठी अपुरी जागा, यावर महापालिकेने आता कायमस्वरूपी तोडगा शोधला आहे. शहरात तब्बल किलोमीटर लांबीचे भुयारी मार्ग तयार करण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला असून, हा प्रकल्प पुणे महानगरपालिका स्वतः राबवणार असल्याची माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली आहे.

पीएमआरडीए नाही, आता 'महानगरपालिका' घेणार पुढाकार सुरुवातीला हा प्रकल्प 'पीएमआरडीए'मार्फत राबवण्याचे नियोजन होते. मात्र, हे सर्व मार्ग महापालिका हद्दीतूनच जाणार असल्याने, प्रकल्पाची सूत्रे आता पालिकेने आपल्या हाती घेतली आहेत. या प्रकल्पाच्या नियोजनासाठी आणि तांत्रिक बाबींसाठी पुढील महिन्यात एका आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागाराचीनियुक्ती केली जाणार आहे. हा सल्लागार पुढील चार महिन्यांत प्रकल्पाचा 'डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट' सादर करेल.

जुना आराखडा बासनात; कोंडीच्या ठिकाणीच होणार बोगदे यापूर्वी प्रस्तावित असलेला 'येरवडा ते कात्रज' हा भुयारी मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने तितकासा प्रभावी ठरणार नसल्याचे आयुक्तांचे मत आहे. त्यामुळे जुन्या त्रुटी असलेला आराखडा बाजूला सारून, शहरातील मुख्य वर्दळीची ठिकाणे - जसे की शनिवारवाडा, स्वारगेट, बाजीराव रस्ता आणि शिवाजी रस्ता - या भागातील कोंडी फोडण्यावर अधिक भर दिला जाणार आहे. जिथे कमी अंतरात जास्त वेळ वाहतुकीत जातो, तिथेच हे बोगदे तयार केले जातील.

निधीचे गणित : केंद्र आणि राज्य सरकार देणार साथ हा प्रकल्प अब्जावधी रुपयांचा असल्याने महापालिकेच्या तिजोरीवर मोठा ताण येईल, अशी भीती होती.

## बोरीभडक पंचायत समिती गणात तिहेरी लढत होणार

**उरुळी कांचन, ता. २२ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी बोरीभडक गणातून डाळिंब (ता. दौंड) येथील पुष्पा बजरंग म्हस्केयांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या गटातील राजकीय समीकरणे अधिकच रंगतदार बनली आहेत.

राष्ट्रवादीकडून साक्षी आकाश गव्हाणे, तर डाळिंब येथून उद्योजक व सामाजीक कार्यकर्ते सागर म्हस्के यांच्या पत्नी राजश्री म्हस्के यांना भाजपाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे हि तिरंगी लढत निश्चित मानली जातआहे. बोरीभडकगणातूनपुष्पाबजरंग म्हस्केयांचे पती बजरंग म्हस्केहे डाळिंब ग्रामपंचायतीचे विद्यमान लोकनियुक्त सरपंच असून त्यांचाही या परिसरात चांगला जनसंपर्क व समाजउपयोगी




कामे केली आहेत. तर उद्योजक व उरुळी कांचन येथील जानाई डेव्हलपर्सचे मालक संदीप गव्हाणे यांच्या भाउजय तर ग्रामपंचायत बोरीभडकचे सदस्य आकाश संभाजी गव्हाणे यांच्या पत्नी या साक्षी गव्हाणे आहेत. त्यामुळे या गणात उमेदवारीवरून मोठी रस्सीखेस सुरु होती. दरम्यान, तिरंगी लढत होणार असल्याने या गणात संघर्ष दिसत आहे. त्यामुळे मतांचे विभाजन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोण कोणाच्या मतांवर परिणाम करणार यावरच अंतिम निकालाचे गणित ठरणार आहे. सुरू असलेल्या उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर कोणाचे अर्ज वैध ठरतात, कोण बाद होतात आणि कोण माघार घेतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे. यामुळे गणातील राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची चिन्हे दुसून येत आहेत.

## पुण्यात सायबर चोरट्याने महिलेला घातला ५ कोटींचा गंडा

**पुणे, ता. २२ :** पुणे शहरातील कोंढवा भागात एका महिलेला डिजिटल अरेस्टच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सायबर चोरट्यांनी पोलीस अधिकारी असल्याचे भासवून मनी लाँड्रिंगचा बनाव रचत संबंधित महिलेकडून ४ कोटी ८२ लाख १४ हजार रुपये उकळले. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १८ डिसेंबर रोजी फिर्यादी महिलेला एका अज्ञात व्यक्तीने फोन केला. फोन करणाऱ्याने स्वतःला पोलीस अधिकारी असल्याचे सांगितले. तुमच्या आधार कार्डचा गैरवापर करून वेगवेगळ्या राज्यांत बँक खाती उघडली असून त्यातून मनी लाँड्रिंगचे व्यवहार झाल्याचा आरोप त्याने केला. त्यामुळे महिलेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर सायबर चोरट्यांनी महिलेला व्हिडिओ कॉलवर सतत संपर्कात ठेवले. तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात आले असून तपास पूर्ण होईपर्यंत कोणाशीही संपर्क साधायचा नाही, असे सांगण्यात आले. अटक टाळण्यासाठी आणि प्रकरण मिटवण्यासाठी तपासासाठी पैसे भरणे आवश्यक असल्याचे सांगून वेळोवेळी विविध बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास भाग पाडण्यात आले.

भीतीपोटी आणि दबावाखाली येऊन महिलेने वेगवेगळ्या टप्प्यांत एकूण ४ कोटी ८२ लाख १४ हजार रुपये चोरट्यांनी सांगितलेल्या खात्यांमध्ये वर्ग केले. बराच काळ गेल्यानंतरही संशयास्पद फोन सुरूच राहिल्याने आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले. त्यानंतर १९ जानेवारी रोजी त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

सध्या सायबर पोलीस तांत्रिक पुरावे, कॉल रेकॉर्ड आणि बँक व्यवहारांच्या आधारे आरोपींचा शोध घेत आहेत. दरम्यान, सायबर पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही तपास यंत्रणा फोन किंवा व्हिडिओ कॉलवरून अटक करत नाही. तसेच चौकशीच्या नावाखाली पैसे मागितले जात असतील, तर तो सायबर गुन्हा असून तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये महिला राज; राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

**पुणे, ता. २२ :** राज्यातील २९ महापालिकांचे निकाल लागले असून आता महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत देखील जाहीर झाली आहे. अनुसूचित जमातीसाठी १, अनुसूचित जातीसाठी ३, नागरिकांचा मागास प्रवर्ग ओबीसीसाठी ८ आणि सर्वसाधारण १७ प्रमाणे आरक्षण जाहीर करण्यात आलंय. आता महापौर पदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर राजकीय पक्षांमध्ये मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत.

पश्चिम महाराष्ट्रातील अनेक महापालिकांवर भाजपाची सत्ता आहे. यात पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका देखील भाजपाकडे आहे. याचदरम्यान आता पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकांसाठी सर्वसाधारण महिला वर्गाचे आरक्षण जाहीर झाले आहे. दरम्यान, महापौर पदासाठी मोठी रस्सीखेच बघायला मि




ळत आहे. आता राजकीय पक्षांकडून सत्तास्थापनेसाठी जोरदार तयारी केली जात आहे. आरक्षण स्पष्ट झाले असून पुणे महापालिकेचे महापौर सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित असणार आहे. आता खुला प्रवर्ग निघाल्याने येथे कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**महिला नगरसेविकांची नावे चर्चेत**

पुणे महानगर पालिकेसाठी महापौरपदासाठी भाजपकडून ५ महिला नगरसेवकांची नावे आघाडीवर आहेत. त्यामध्ये रंजना टिळेकर, मंजुषा नागपुरे, मानसी देशपांडे, रोहिणी चिमटे यांच्या नावाचा समावेश आहे. मा मंजुषा नागपुरे यांनी यंदाच्या महापालिकेत बिनविरोध विजय मिळवला होता. रंजना टिळेकर या आमदार योगेश टिळेकर यांच्या आई आहेत त्यांची ही सहावी टर्म आहे. त्यामुळे त्यांचेही नाव महापौरपदासाठी जोरदार चर्चेत आहे.

## शहरातील अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई करा; मुरलीधर मोहोळ यांच्या आयुक्तांना सूचना

**पुणे, ता. २२ :** शहर फ्लेक्स मुक्त करण्याचा शब्द आम्ही पुणेकरांना दिला असून, नवनिर्वाचित नगरसेवकांचे जे फ्लेक्स पुण्यात लागले आहेत, त्या काढण्याच्या सूचना महापालिका आयुक्तांना केल्याचे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले. पुणे श्रमिक पत्रकार संघात आयोजित केलेल्या वार्तालाप कार्यक्रमात मोहोळ बोलत होते.

या वेळी पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणीस मंगेश फल्ले, खजिनदार दिलीप तायडे उपस्थित होते. महापालिकेचे मोठे प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य दिले जाणार असल्याचेही मोहोळ यांनी या वेळी नमूद केले. महापालिका निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाजपने शहरातील रस्ते आणि पदपथ अतिक्रमण मुक्त करण्यासोबतच विद्रुपीकरण थांबवण्यासाठी फ्लेक्स मुक्त पुण्याचे आश्वासन दिले आहे.

याशिवाय मुख्यमंत्र्यांनीही जाहीर मुलाखतीत कार्यकर्त्यांना याबाबत आवाहन केले होते. असे असतानाही शहरभर अभिनंदनाचे फ्लेक्स लागलेच. यावरून विरोधकांनी टीका सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी अनधिकृत फ्लेक्स तातडीने काढण्याच्या सूचना महापालिका आयुक्तांना केल्याचे सांगितले. मात्र, ते कधीपर्यंत काढणार, याचे उत्तर मात्र ते देऊ शकले नाहीत.

निवडणुकीमध्ये विरोधकांनी



स्तर सोडून आणि व्यक्तिगत टीका करून नकारात्मक राजकारण केले. आम्ही मात्र, तसे न करता केवळ विकासावर बोललो, असा दावा मोहोळ यांनी केला. शहराच्या भविष्य, विकासाची दिशा आणि कामाचे स्वरूप पाहूनच मतदार कुणाला मत द्यायचे, याचा निर्णय घेतात. त्यांना टीका टिप्पणीशी काहीही देणे घेणे नसते. त्यामुळे आम्ही जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये सुद्धा टीका टिप्पणी न करता केवळ विकासावर बोलणार आहोत, असे मोहोळ म्हणाले. महापालिकेतील महत्त्वाची पदे मुख्य शहरातील नगरसेवकांना दिल्यास समाविष्ट गावे आणि उपनगरांतील कामांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे, याबाबत विचारले असता मोहोळ म्हणाले, की असे होणार नाही. शहराच्या सर्वांगीण विकासाचा अजेंडा डोळ्यांसमोर ठेवूनच काम केले जाणार आहे.

**स्वीकृतबाबत वरिष्ठांचा निर्णय**

महापालिका निवडणुकीपूर्वी शिंदे सेनेसोबत युती नव्हती. त्यामुळे त्यांना स्वीकृत नगरसेवकपद देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही, असे स्पष्ट करतानाच स्वीकृत नगरसेवक पदे देताना ज्यांना संधी मिळाली नाही, त्यांचा विचार होऊ शकतो. मात्र, याबाबत वरिष्ठच निर्णय घेणार आहेत, असेही मोहोळ यांनी स्पष्टपणे सांगितले.